लोकमत
हॅलो नागपूर
सोमवार, दि. ९ एप्रिल २००७




युनिव्हर्सल होमिओपॅथी असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीच्या पदग्रहण समारंभात पदाधिकाऱ्यांना सूत्रे सोपविताना प्रमुख पाहुणे.

# होमिओपॅथीला शासनसेवेत मान्यता मिळावी -डॉ.अमर निकम

▶प्रतिनिधी

नागपूर, दि.८ - कोणत्याही जटील अथवा असाध्य रोगावर होमिओपॅथीमध्ये प्रभावी उपचार आहेत. चिकनगुनियासारख्या व्हायरस रोगावर होमिओपॅथीने प्रभावीपणे कार्य केले आहे. या पॅथीला अधिक लोकाभिमुख करायचे असेल तर होमिओपॅथीला शासनसेवेत मान्यता मिळावी अशी मागणी पुण्याचे विख्यात होमिओ डॉक्टर अमर निकम यांनी आज येथे केली.

युनिव्हर्सल होमिओपॅथी असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीच्या पदग्रहण समारंभाच्या वेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध होमिओ डॉक्टर विलास डांगरे होते. यावेळी डॉ. प्रभाकर भोयर, डॉ. उदय नाईक अकोला हे प्रमुख अतिथी होते.

यावेळी होमिओपॅथीचे चमत्कार या विषयावर बोलताना डॉ. निकम म्हणाले की, होमिओपॅथीच्या सखोल अभ्यास व शस्त्रीय संशोधनामुळे असाध्य रोगांवरही उपचार केला जाऊ शकतो.

अतिशय गंभीर आजारावर होमिओपॅथी परिणामकारक आहे. या पॅथीमध्ये नवेनवे संशोधन होत आहे. कॅन्सर, एड्स, किडनीसंबंधी रोगावर होमिओपॅथीमध्ये उपचाराचे नवे द्वार उघडले आहे.

भारतासारख्या देशांत होमिओपॅथीचा विकास अत्यंत आवश्यक आहे. कारण भारतात गरीब जनता राहते. त्यांना महागड्या तपासण्या व उपचार पद्धती परवडणाऱ्या नाहीत. होमिओपॅथीमध्ये या साऱ्या गोष्टींना फाटा देण्यात आला असून स्वस्त व परिणामकारक उपचार पद्धतीमुळे ही पॅथी लोकप्रिय होत आहे. होमिओपॅथीवर नेहमी लागणारे आरोप जसे पथ्य पाळावे लागते, आधी रोगाला वाढवते वगैरेला नकार देताना ते म्हणाले की, आमच्या दवाखान्यात जे रुग्ण येतात त्यांना खाण्यावर बंदी घालत नाही. तसेच होमिओपॅथीमुळे उशिरा आराम मिळतो याही आरोपाचा इन्कार करीत ते म्हणाले की होमिओपॅथी ही जलद व परिणामकारक उपचार पद्धती आहे.

होमिओपॅथीचे गैरसमज दूर करण्यासाठी राज्यातील होमिओ कॉलेजने पुढाकार घ्यावा.

कॅन्सरवर होमिओपॅथीमध्ये परिणामकारक उपचार आहेत परंतु अखेरच्या पायरीपर्यंत जर रुग्ण पोहचला असेल तर त्याला वाचविणे कठीण जाते. पुण्यात डॉक्टर निकम यांचे आदित्य होमिओ हे ६० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय असून येथे वेगवेळ्या रोगांवर संशोधन सुरूच असतात.

आपण आतापर्यंत हृदय विकाराने ग्रस्त असलेल्या हजारो रुग्णांना बरे केले असून त्यांच्यावर बायपास अथवा इतर शस्त्रक्रियेची पाळी येऊ दिली नाही.

यावेळी डॉक्टर निकम यांनी चार केसेस विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी सादर केल्या.

यावेळी बोलताना डॉ. विलास डांगरे यांनी विद्यार्थ्यांना निष्ठेने होमिओपॅथीची प्रॅक्टिस करण्याचे आवाहन केले.

**पदग्रहण**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष डॉ.हरीश हरणे, उपाध्यक्ष डॉ. अभय वाळके व सचिव डॉ. अभय राजगिरे व त्यांच्या चमूने पदभार स्वीकारला. या कार्यक्रमाला संपूर्ण विदर्भातून ५०० होमिओ डॉक्टर उपस्थित होते.